ePaper

## संभाजी भिडे त्यांच्या जागी योग्य : बच्चू कडूंचं वक्तव्य



|वर्ष - 6 ।अंक - 202 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शनिवार ।दिनांक 5नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा निवडणूक
- जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ'ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार!
- ...पण मी सांगितलं होतं मी पुन्हा येईन ; आम्ही करेक्ट कार्यक्रम केला


## वाल्हेकरवाडी-स्पाईन रस्ता ते सांगवी-किवळे

# रुंदीकरणाला अखेर 'गती'!

### डेअरी फार्मच्या जागा हस्तांतरणाला राज्य सरकारचा हिरवा कंदील



### पशू संवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची बैठक

।पिंपरी-चिंचवड ।

।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील वाल्हेकरवाडी चौक ते सांगवी-किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतचा ४५ मी. रूंद स्पाईन रस्ता विकसित करण्यासाठी जागा हस्तांतरण करणेबाबत व नदीवरील पूल बांधण्याच्या कामास राज्य सरकारने हिरवा कंदिल दाखवला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या कामाला 'गती' मिळेल, अशी माहिती भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी तथा माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी दिली.**

पशू संवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पुण्यातील विधान भवन येथे बैठक घेतली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, पशु संवर्धन विभागाचे अधिकारी, महापालिका अधिकारी उपस्थित होते. यावेळी ताथवडेतील डेअरी फार्ममधील जागा महापालिकेच्या प्रयोजनासाठी घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून तसा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रलंबित होता. याबाबत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू होता. त्याला यश मिळाले आहे. बीआरटी विभागाचे सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे म्हणाले की, वाल्हेकरवाडी चौक ते सांगवी-किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडेपर्यंतचा ४५ मी. रूंद स्पाईन रस्ता विकसित करण्यासाठी वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील जागा हस्तांतरित करण्याच्या मोबदल्यात काही कामे प्रस्तावित केली आहेत. यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि राज्य सरकारच्या सकारात्मक भूमिकेमुळे रस्ता रुंदीकरण काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.




### हिंजवडी व तळवडे आयटी पार्क जोडणारा रस्ता होणार प्रशस्त...

वाल्हेकरवाडी चौक ते सांगवी-किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौक, ताथवडेपर्यंत सदरचा रस्ता हा सांगवी किवळे बीआरटी रस्ता (४५.००मी) व स्पाईन रस्ता (४५.०० मी) यांना जोडणारा जवळचा मार्ग असून, यामुळे चिंचवडगावातील वाहतूक कोंडी दूर होईल. तसेच, हिंजवडी आय.टी.पार्क व तळवडे आय.टी. पार्क यांना जोडणारा जवळचा मार्ग आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे यापूर्वी वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील स.नं.२०, २४ व २५ मधील २.४० हेक्टर क्षेत्र जकात नाका, बोट क्लब व ४५ मी., ३४.३५ मी. रस्ता रुंदीकरणासाठी हस्तांतरित केलेली आहे.

### महापालिका मैलाशुद्धीकरण प्रकल्प उभारणार...

दरम्यान, वाल्हेकरवाडी चौक ते सांगवी-किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतचा ४५ मी. रुंद स्पाईन रस्ता (क्षेत्र ४.४८ हेक्टर) व मैलाशुद्धीकरण प्रकल्पासाठी (क्षेत्र ०.७० हेक्टर) विकसित करण्याकरिता लागणाऱ्या एकूण (५.१८ हेक्टर) क्षेत्राचा महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त दर सूचीनुसार १८.५३ कोटी रुपये इतके मूल्यांकन होत असल्याचे कळविले आहे. यासाठी भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळातमहापालिका सर्वसाधारण सभेत ठराव करुन जागेच्या बदल्यात पशुसंवर्धन प्रक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात विविध विकासकामे करण्याकरिता ३० कोटी रुपयांच्या रकमेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

### वाकड आणि परिसरातील पाणी प्रश्न सुटणार...

वेगाने विकसित होणाऱ्या वाकड, ताथवडे, पुनावळे, काळाखडक यासह थेरगाव आदी भागातील पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी डेअरी फार्म येथील २ एकर जागेत उच्च क्षमतेचा जलकुंभ उभारण्याकरिता जागा महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करावी. याबाबत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. डेअरी फार्मची जागा ही सभोवतालच्या परिसराच्या तुलनेत उंचवट्यावर असल्यामुळे या जागेत जलकुंभ उभारल्यास नव्याने विकसित झालेल्या गृहनिर्माण सोसायटी आणि गावठाण भागातील पाणीपुरवठा सुरळीत करणे शक्य होणार आहे. त्यामुळे डेअरी फार्मच्या जागेवर जलकुंभ उभारणीच्या कामाला मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे, अशी माहिती शंकर जगताप यांनी दिली.



> **"डेअरी फार्ममधील जागेच्या मोबदल्यात महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात येणाऱ्या विकासकामांची निविदा प्रक्रिया राबवण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी ना हरकत प्रत्र मिळावे, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य सरकारकडे पाठवला आहे. तसेच, जागा हस्तांतर करुन रस्त्याच्या कामाला गती देण्याची अपेक्षा आहे. तसेच, जलकुंभ उभारणीसाठी जागा उपलब्ध व्हावी. याबाबत पशू संवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना सविस्तर मागणी केली होती. राज्य सरकारकडून सकारात्मक भूमिका घेतली असून, दि. ९ नोव्हेंबर रोजी नियोजित बैठकीत जागा हस्तांतरणाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री महोदय यांनी दिले आहे.**
>
> **- शंकर जगताप,** निवडणूक प्रभारी, भाजपा, चिंचवड विधानसभा.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा निवडणूक

## पदवीधर मतदारसंघासाठी तब्बल 98 जणांचे अर्ज

।पुणे ।महाईन्यूज।



अधिसभेचा कार्यकाळ संपुष्टात आला असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघासाठी तब्बल ९८ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.पुणे विद्यापीठाचे पदवीधर तसेच पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात वास्तव्यास असलेल्या आणि पुणे विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यास देण्यात आलेली मुदत गुरुवारी संपली. त्यामध्ये दिलेल्या मुदतीत खुल्या प्रवर्गातून ४६, अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातून २४, विमुक्त जाती-भटक्या जमाती (डीटीएनटी) प्रवर्गातून ९, इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) १७, असुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून ४ आणि महिला प्रवर्गातून ८ असे एकूण ९८ अर्ज प्राप्त झाले आहेत. शुक्रवारी (४ नोव्हेंबर) आलेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार असून शनिवार (५ नोव्हेंबर) हा अर्ज माघारी घेण्यासाठीची मुदत असणार आहे. २० नोव्हेंबर रोजी निवडणूक पार पडेल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी विद्यापीठ विकास मंचच्या दहा उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. या वेळी मंचचे समन्वयक राजेश पांडे, डॉ. राजेंद्र विखे, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. अपूर्व हिरे उपस्थित होते. विद्यापीठ विकास मंचच्या वतीने पुण्यातील प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, राहुल पाखरे, गणपत नांगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नगरमधून युवराज नरवडे आणि सचिन गोरडे यांना तर, नाशिकमधून विजय सोनवणे आणि सागर वैद्य यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# फेरीवाला समिती निवडणुकीतील अंतिम मतदारयादीत परस्पर कपात?

## महापालिका प्रशासन-पथारी संघटना आमने सामने



।पुणे। महाईन्यूज ।

फेरीवाला समिती निवडणुकीसाठी महापालिका प्रशासनाने पथारी व्यावसायिकांची अंतिम मतदार यादी ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध केली होती. मात्र निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताना एक दिवस आधी अंतिम मतदार यादीतील २२ हजार ८८९ पथारी व्यावसायिक मतदारांपैकी १० हजार मतदारांची नावे प्रशासनाकडून वगळण्यात आली आहेत, असा आरोप पथारी संघटनांनी केला आहे. हा निर्णय नैसर्गिक न्यायाच्या आणि लोकशाही पद्धतीने निरपेक्ष निवडणूक घेण्याच्या प्रक्रियेला अत्यंत घातक आहे, असा दावाही संघटनांकडून करण्यात आला आहे. फेरीवाला समिती निवडणुकीचा कार्यक्रम आणि अंतिम मतदार यादी अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून काही दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पथारी व्यावसायिक पंचायतीचे नितीन पवार, मोहन चिंचकर, इकबाल आळंद, नीलम अय्यर,अंबर नागलकर यांनी हा आरोप केला आहे. त्या संदर्भातील निवेदनही आयुक्त आणि अन्य अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. मतदार यादीतून मतदारांची नावे रद्द करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

समिती निवडणुकीसाठी पात्र मतदारांची अंतिम मतदार यादी ऑगस्ट मध्ये जाहीर करण्यात आली होती. मात्र ऐनवेळी पूर्वीच्या अंतिम यादीत परस्पर कपात करून दहा हजारांहून अधिक मतदारांना वगळण्यात आले आहे. कोणतीही निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याआधी पुरेसा काळ ठेवून मतदार नोंदणी आणि यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. महाराष्ट्र पथ विक्रेता नियम २००६ मध्येही निवडणूक दिनांकाच्या एक महिना आधी अंतिम मतदार यादी विषयी आक्षेप, हरकती घेण्याचा नियम आहे. मात्र प्रक्रिया सुरू असताना मतदार यादीत कपात करणे अन्यायकारक आहे. सर्वेक्षण करून व्यवसायासाठी जागेवर नसलेल्यांची नावे वगळण्यात आली आहेत. मात्र त्यातूनही अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. नावे रद्द झालेल्यांची अधिकृत पथारी नोंदणी रद्द करण्याची प्रक्रियाही प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे मतदारांचा केवळ मतदानाचा नव्हे तर रोजगाराचा हक्कही महापालिका प्रशासनाकडून हिरावून घेण्यात आला आहे, असे नितीन पवार यांनी सांगितले.

# भूमिगत गटाराची स्वच्छता करताना दोघांचा मृत्यू

## शिरूरच्या फियाट कंपनीतील घटना

।शिरूर। महाईन्यूज ।

शिरूर औद्योगिक वसाहतीतील फियाट कंपनीत भूमिगत गटाराची स्वच्छता करताना चेंबरमध्ये पडून दोघांचा मृत्यू झाला. मच्छिंद्र दादाभाऊ काळे (वय ४२, शिंदोडी, ता. शिरूर), सुभाष सुखदेव उघडे (वय ३४, रा. शिरूर) अशी या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी औद्योगिक वसाहतीतील फियाट कंपनीत काळे आणि उघडे हे दोघे भूमिगत गटाराची स्वच्छता करीत होते. त्यावेळी सुभाष उघडे हे पाय घसरून चेंबरमध्ये पडले. त्यामुळे त्यांना बाहेर काढण्यासाठी मच्छिंद्र काळे यांनीही चेंबरमध्ये उडी घेतली. उघडे यांनी बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मात्र, तो यशस्वी झाला नाही. हा प्रकार लक्षात आल्यानंतर दोघांना इतरांनी बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, दोघेही मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दत्तात्रय दादाभाऊ काळे (रा. शिंदोडी. ता. शिरूर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक बळवंत मांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सरजिने हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# भिंत कोसळून महिलेसह सहा महिन्यांचे बालक जखमी

।पुणे। महाईन्यूज ।



पुण्यातील गंज पेठ परिसरात शुक्रवारी सायंकाळी घराची भिंत कोसळून महिलेसह सहा महिन्यांचे बालक जखमी झाले. दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने मदतकार्य करून राडारोडा हटविला. गंज पेठेतील मासे आळी परिसरात शुक्रवारी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास घराची भिंत पडल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. दुमजली घराचा काही भाग शेजारी असलेल्या बैठ्या घराच्या पत्र्यावर कोसळल्याने सरस्वती सुदाम परदेशी (वय ५०), रुद्रांक्ष हर्षद परदेशी (वय सहा महिने) दोघे किरकोळ जखमी झाले. जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन राडारोडा हटविला. परदेशी यांच्या घरातील गृहोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. अग्निशमन दलाचे अधिकारी प्रशांत गायकर, जवान प्रशांत मखरे, चंद्रकांत गावडे, तेजस भट, ओंकार बोंबले, गौरव कांबळे यांनी स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर तत्काळ बाहेर काढले.

### शहरात दोन ठिकाणी आग

शहरात शुक्रवारी दोन ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. आगीत भाजल्याने एक जण जखमी झाला.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ'ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार!

## प्राचार्या मृदुला महाजन यांची माहिती : उत्तर प्रदेश येथे दि. 12 नोव्हेंबर रोजी होणार वितरण

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्यातील पहिले संतपीठ पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात आले. अल्पावधीतच संतपीठाचा लौकीक आंतरराष्ट्रीय पातळीवर झाला आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेला सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देणारी सर्वोत्कृष्ठ शाळा पुरस्कार जाहीर झाला आहे, अशी माहिती प्राचार्या मृदुला महाजन यांनी दिली.**



इंटरनॅशनल युनायटेड एज्युकेशनिस्टस फ्रेटरनिटी या संस्थेद्वारे आंतरराष्ट्रीय मेगा समीट आणि शैक्षणिक उत्कृष्ठता पुरस्कार कार्यक्रमांतर्गत अयोध्या- उत्तरप्रदेश येथे दि. १२ नोव्हेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावेळी सीबीएसई बोर्डाचे सेक्रेटरी अनुराग त्रिपाठी उपस्थित राहणार आहेत.

प्राचार्या मृदुला महाजन म्हणाल्या की, सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून इंग्रजी भाषेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबरोबरच संत साहित्याचे शिक्षण देऊन भारतीय संस्कृती व परंपरेची शिकवण देणे हे संतपीठाचे वैशिष्टय आहे. शाळेच्या वेळापत्रकामध्ये शैक्षणिक विषयांसह संत साहित्य, तबला वादन, पखवाज वादन, श्लोक, अभंग, स्त्रोत, हरिपाठ पठण, संगीत, नृत्य हे विषय मुलांना शिकवले जातात. त्याचप्रमाणे येथे महाराष्ट्रातील नव्हे, तर भारतभर कार्य केलेल्या अनेक संतांच्या जयंतीचे तसेच पुण्यतिथीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती दिली जाते. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सकारात्मक पाठपुराव्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये राज्यातील पहिले संतपीठ सुरू झाले. त्याच्या कार्याची दखल देशभरात घेतली जात आहे. संत नामदेव व संत ज्ञानदेव महाराज पुन:भेट सोहळा, ग्रंथ दिंडी, वाचन संस्कार, स्वच्छतेचे महत्त्व, गणेशोत्सव, कृष्ण जन्माष्टमी, नवरात्रोत्सव आदी उमक्रमांद्वारे अध्यात्म व विज्ञान यांचा दुवा म्हणजे संत साहित्य आहे याची शिकवण मुलांना दिली जाते, असेही प्राचार्या मृदुला महाजन यांनी म्हटले आहे.

**"पिंपरी- चिंचवडला वारकरी संप्रदायाचा वारसा आहे. संतपीठाची इमारत उभारणीपासून शालेय अभ्यासक्रम आणि अध्यात्मिक, विज्ञानाधारित शिक्षण प्रणाली याबाबत त्या-त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेतले जाते. मूल्याधिष्ठित आणि आध्यात्मिक शिक्षण प्रणाली समाजात रुजवण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात आदर्शवत काम संतपीठाच्या माध्यमातून होईल, असा विश्वास वाटतो.**
**- महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड.

दरम्यान, महापालिका आयुक्त तथा प्रशासक आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज संत पीठाचे अध्यक्ष शेखर सिंह यांनी सर्व संचालक, प्राचार्य आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. संत पीठाचे संचालक व राज्याच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, संचालक व संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष डॉ. अभय टिळक, संचालिका डॉ. स्वाती मुळे, ह.भ.प. राजू महाराज ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संतपीठाने वैविद्यपूर्ण उपक्रम अल्पावधीत राबवले आहेत. "आले मूळ भेदी खडकाचे अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धी।।" या तुकोबारायांच्या उत्कीप्रमाणे संतपीठ स्कूल ही काळाची गरज ओळखून वैश्विक नागरिक घडवण्याचे कार्य करीत आहे.

---

# पत्रकारांसाठी कल्याणकारी मंडळाच्या निर्मितीची गरज !

## यशवंत भोसले यांचे आवाहन : पत्रकार दिवाळी फराळ कार्यक्रम उत्साहात

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्रातील पत्रकारांच्या उन्नतीसाठी राज्य सरकारने कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे असे आवाहन राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भोसले यांनी पिंपरी येथे केले.ते पत्रकारांच्या दिवाळी फराळ कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे हे होते.**



अखिल मराठी पत्रकार संस्था संलग्न असलेल्या पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या वतीने पिंपरी महानगरपालिका पत्रकार कक्षामध्ये दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भोसले बोलत होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अँड संजय माने,अँड भोसले,पत्रकार संघाचे अध्यक्ष दादाराव आढाव, वरिष्ठ उपाध्यक्ष संतलाल यादव,सरचिटणीस सुनील कांबळे,पत्रकार सायली कुलकर्णी इत्यादी मान्यवर व अनेक पत्रकार उपस्थित होते.

यशवंत भोसले म्हणाले " महाराष्ट्रात विविध क्षेत्रातील घटकांसाठी राज्य सरकारच्या वतीने महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. ज्याद्वारे त्या समाजातील लोकांना न्याय मिळत आहे. पत्रकार हा समाजाचा महत्वाचा घटक आहे. समाजातील शोषित,वंचित, पिडीत लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकार सातत्याने त्यांच्या लेखणीतून ही बाब प्रशासन व सरकारपर्यंत पोहोचवण्याचे महत्वाचे काम करतात. अनेक पत्रकार मानधनावर आणि कंत्राटी पद्धतीने काम करतात. त्यांच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. संघटित आणि असंघटित पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करून त्याद्वारे पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हिताच्या विविध योजना राबवाव्यात अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे प्रस्तावाव्दारे अखिल मराठी पत्रकार संस्था व राष्ट्रीय कामगार आघाडीच्या वतीने लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगून ते म्हणाले की पत्रकारांच्या कुटुंबियांना शासकीय व खाजगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशीही मागणी करणार असल्याचे राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष व नॅशनल फ्रंट ऑफ इंडियन ट्रेड युनियनचे (एनफिटू) वरिष्ठ उपाध्यक्ष यशवंत भोसले यांनी केली केली आहे.

**यशवंत भोसले म्हणाले " महाराष्ट्रात विविध क्षेत्रातील घटकांसाठी राज्य सरकारच्या वतीने महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. ज्याद्वारे त्या समाजातील लोकांना न्याय मिळत आहे. पत्रकार हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. समाजातील शोषित,वंचित, पिडीत लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकार सातत्याने त्यांच्या लेखणीतून ही बाब प्रशासन व सरकारपर्यंत पोहोचवण्याचे महत्वाचे काम करतात. अनेक पत्रकार मानधनावर आणि कंत्राटी पद्धतीने काम करतात. त्यांच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. संघटित आणि असंघटित पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करून त्याद्वारे पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हिताच्या विविध योजना राबवाव्यात अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे प्रस्तावाव्दारे अखिल मराठी पत्रकार संस्था व राष्ट्रीय कामगार आघाडीच्या वतीने लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगून ते म्हणाले की पत्रकारांच्या कुटुंबियांना शासकीय व खाजगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात**

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अँड संजय माने,संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे इत्यादींची भाषणे झाली.पत्रकार संघातर्फे आयोजित " दिवाळी फराळ " कार्यक्रमासाठी महापालिकेचे साफसफाई कर्मचारी, सुरक्षा रक्षक, शिपाई,आणि लिफ्टमन इत्यादींना निमंत्रित करण्यात आले होते.

पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महेश मंगवडे,संजय बोरा,चिटणीस श्रद्धा कोतावडेकर कोषाध्यक्ष जितेंद्र गवळी,सदस्य विनय लोंढे, संतोष जराड, गणेश शिंदे,कलिंदर शेख,अमोल डंबाळे,प्रितम शहा,नदू रानडे,मुकुंद कदम,विश्वास शिंदे आदी पत्रकार यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष दादाराव आढाव यांनी केले तर आभार सायली कुलकर्णी यांनी मानले.

## संपादकीय

# छोट्या गुंतवणूकदारांचे हित जपा

***जगभरात कोठेही दिसली नाही, एवढी शेअर बाजारातील वृद्धी सध्या दिसत आहे. परंतु त्या भरभराटीत सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा समावेश आहे का? 'डिलिस्ट'मुळे होणारे किरकोळ गुंतवणूकदारांचे आर्थिक नुकसान कमी करता येईल काय, या प्रश्नांचा वेध.***

भारतातील शेअरबाजार सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अजब-गजब ठरलेला असून त्याचा लहरीपणा सध्याच्या पावसासारखा झाला आहे. रिझर्व्ह बँक म्हणते निर्देशांकवाढ हा फुगवटा आहे. जगभरात कोठेही दिसली नाही, एवढी वृद्धी भारतात या निर्देशांकामुळे दिसत आहे. तथापि सट्टेबाजांच्या कावेबाज कृत्यांनी श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आहेत; पण किरकोळ गुंतवणूकदारांचा फायदा किती झाला? ते धनाढ्य झाले काय, याचे उत्तर 'नाही' असे आहे. अशा परिस्थितीत आजकाल शेअरबाजारात, अनेक कंपन्या आर्थिक संकटांमुळे व शेअरबाजार सदस्यत्वाचे वार्षिक शुल्क न भरल्यामुळे त्यांचे शेअर बाजारातील लिस्टिंग चालू ठेवण्यास असमर्थ ठरत आहेत. जेव्हा असे होते, तेंव्हा सदर डीलिस्ट होणाऱ्या कंपन्यांच्या शेअरना 'विक्रीमूल्य' नसल्याने सर्व भागधारकांचे मोठे नुकसान होते. मोठे गुंतवणूकदार, सट्टेबाज आणि गुंतवणूक संस्था सदर डीलिस्ट होणाऱ्या कंपन्यांच्या शेअरमुळे होणारी हानी इतर उत्पादक शेअर व्यवहारातून होणाऱ्या नफ्यातून वजावट घेऊन टाळू शकतात. पण कंपनीच्या भागभांडवलाच्या दोन लाख रुपयांपर्यंतचे समभाग धारण करणारे छोटे भागधारक या रोजच्या खरेदी विक्रीत नसल्याने या फायद्यापासून वंचित राहतात.'दिवाण हाऊसिंग फायनान्स'चे शेअर 'बीएसई' आणि 'एनएसई'वर अंतिम वेळी विकले गेले, त्या दिवशी जास्तीत जास्त घसरू शकणाऱ्या १०% किंमतीच्या पातळीखाली म्हणजे १६.७० रुपयांवर बंद झाले होते. 'एनसीएलटी'च्या आदेशानुसार ज्यावेळी या शेअर बाजारांनी 'डीएचएफएल'मधील व्यापार स्थगित केला, त्यावेळी कंपनीच्या समभागांना कोणतेही 'मूल्य' दिले नव्हते.

# विझू विझू झाल्या ज्योती




आमचे राजकीय नेते सातत्याने आगामी हिवाळा हा 'कठोर' असल्याने तयारीत रहा, असा सावधानतेचा इशारा देत आहेत. वैयक्तिक स्तरावर कोणत्या उपाययोजना करता येतील, या उपाययोजनांचा प्रभाव, परिणामकारकता, शाश्वतता आणि संभाव्य गैरसोयींवर लक्ष केंद्रित चर्चा सुरू आहे. उदाहरणार्थ, घरातील तापमान १९ अंश सेल्सिअसपर्यंत सीमित ठेवण्यास सांगण्यात आले आहे, जे आधी २१ अंश होते. तसेच, आम्हाला थंड पाण्याने आंघोळ (शॉवर) करा, स्वयंपाकघरातील सिंक आणि वॉश बेसिनमधील गरम पाण्याचे नळ बंद करा, वॉशिंग मशीनमध्ये कपडे धुताना ड्रायरचा वापर करू नका, त्याऐवजी कपडे दोऱ्यांवर सुकत घाला आणि ऊर्जेचा वापर कमी करणाऱ्या दिव्यांचा वापर करा, असे नानाविध उपाय सांगण्यात आले आहेत. सार्वजनिक वाहतूक आणि कार्यालयांमधील तापमानही १९ अंशांपर्यंत कमी करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, रात्रीच्या वेळी कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीची आणि कार्यालयाची इमारत अतिप्रकाशित असता कामा नये, असेही सांगण्यात आले आहे. केवळ वृद्धाश्रम या नियमांना अपवाद असतील. येथील आतले तापमान नेहमीप्रमाणे २१ अंश ते २३ अंशांपर्यंत ठेवण्यास मुभा आहे.

सद्यस्थितीत तरी हे उपाय बंधनकारक नाहीत. 'ब्लॅकआऊट' आणि त्याचा आर्थिक उत्पादनावरील प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी, जनतेला ऊर्जावापर कमी करण्यास उद्युक्त करणे, हे त्यामागील उद्दिष्ट आहे. काही उद्योग मोठ्या प्रमाणावर वीज आणि गॅसवर अवलंबून आहेत. टंचाई जाणवल्यास या प्रकल्पांना उत्पादन कमी करावे लागेल आणि त्यांच्या कामाचे तासही कमी करावे लागतील. परिणामी, कर्मचाऱ्यांना कमी वेतन मिळेल परंतु ऊर्जेची किंमत वाढेल. देशातील काही भागांतील वीजबिलांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २७० टक्के वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यस्तरावरील अनेक सार्वजनिक कार्यालये आणि राजधानीतील संसद भवनाने 'थर्मोस्टॅट' म्हणजे हवामान स्वयं-नियमन यंत्रांचा वापर सध्या कमी केला आहे. त्यानंतर नागरिकांनी घरातही काही बदल करण्यास



सुरुवात केली आहे. ते गैरसोयीचे वाटत असले, तरी विजेच्या वापराकडे गंभीरपणे पाहण्याची ही एक संधी मानली जात आहे. सरकारने केलेल्या सूचना सहज स्वीकारल्या गेल्या नाहीत. त्यावर जोरदार चर्चा झाल्या, टीकाही झाली. ख्रिसमस काळात सार्वजनिक ठिकाणी रोषणाईबाबत काय भूमिका घेतली जाते, याची अनेकांना उत्सुकता वाटते. हिवाळा हा खरोखरच थंड, अंधारा आणि उदास असतो. संध्याकाळी चार वाजताच इथे काळोख होतो. अशा वातावरणात ख्रिसमसच्या रोषणाईचा सकारात्मक मानसिक परिणाम दिसत असला तरी त्यामुळे किती वीज खर्च होते याचा विचार आता करावा लागणार आहे. काहींच्या मते हे कृत्रिम दिवे कमी ठेवले किंवा संपूर्णपणे बंद ठेवले तर त्याचा प्रतिकूल परिणाम लोकांच्या आरोग्यावर होईल आणि तसेही त्यातून फार मोठ्या विजेची बचत होणार नाही. मात्र काहींचा या मताला विरोधही आहे. इतर सूचनांबातही दोन्ही बाजूंनी चर्चा झडत आहेत. हिवाळ्यात लोकांना ऊब मिळावी आणि त्यांनी एकत्र यावे, यासाठी इनडोअर स्विमिंग पूल, सोना बाथ आणि मनोरंजनपर उद्याने यांसारख्या काही जागा आहेत. या जागांवर गॅस किंवा विजेने ऊब निर्माण करणे कितपत योग्य आहे? या जागा बंद केल्या तर अशी काय मोठी हानी होणार आहे? असे म्हणणारे आणि या उपायांमळे काय मोठा फरक पडणार आहे, असे विचारणारेही आहेत. ८० लाखांच्या आसपास लोकसंख्येच्या स्वित्झर्लंडला पर्वतराजी, तळे, नद्या आणि घनदाट जंगलांचे वरदान लाभले आहे. हा देश जगण्यासाठी याच संसाधनांवर पूर्णपणे अवलंबूनही आहे. अल्पाइनचा बर्फाच्छादित प्रदेश आणि हिमनद्यांमुळे मोठ्या युरोपियन नद्यांना पाणी मिळते. हवामान बदलामुळे अल्पाइनच्या परिसंस्थेवर किती परिणाम झाला, हे गेल्या १० वर्षांवर नजर टाकल्यास कळेल. हिमनद्यांचे जलद वितळणे, बर्फवृष्टीचे घटणारे प्रमाण आणि उन्हाळ्यात वाढणारा उष्मा यामुळे अनेकांच्या मनात भीती आहे.

# 'सायबर' गुन्ह्यांचे आव्हान

**सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलले आहे. रस्त्यावरील गुन्हेगारी कमी झाली असून, गुन्हेगारांचा कल कमी जोखमीच्या सायबर क्षेत्राकडे वळला आहे. त्यामुळे सायबर फसवणूक रोखण्यासाठी सावधगिरी आणि सायबर साक्षरता हाच उपाय आहे.**

इंटरनेटमुळे दैनंदिन जीवन सुलभ बनले आहे आणि वेळेची बचतही होत आहे. मात्र, या सायबर विश्वात वावरताना कोणती काळजी घ्यावी, काय करावे, काय करू नये याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने या विश्वात टपून बसलेले सायबर चोर संधी मिळताच हल्लाबोल करीत आहेत. पकडले जाण्याची जोखीम कमी आणि फायदाच फायदा असल्याने आर्थिक फसवणूक, सेक्सटॉर्शन, बदनामी, सोशल पाठलाग, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण असे सायबरमधील गुन्हे इतर गुन्ह्यांच्या तुलनेत कित्येक पटीने वर्षागणिक वाढत आहेत.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोने देशभरातील सायबर गुन्ह्यांची जारी केलेली आकडेवारी पाहिली तर हा विषय किती गंभीर आहे याची कल्पना येते. देशभरात २०२१ मध्ये ५० हजार ९७४ सायबर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. हा आकडा २०२० च्या तुलनेत जवळपास सहा टक्क्यांनी अधिक आहे. महाराष्ट्राचा



विचार केला तर २०२१ मध्ये ५५६२ गुन्हे दाखल असून, सायबर गुन्ह्यांमध्ये राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे महिला, लहान मुले यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या लैंगिक शोषणाबाबत नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या आकडेवारीनुसार राज्यात ४८७ गुन्हे आहेत आणि या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. सोशल मीडियाच्या व्यासपीठावर १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांचा बऱ्यापैकी वावर असतो. अमेरिका, तसेच पाश्चात्त्य देशांमध्ये सोशल मीडिया वापरण्यासाठी १३ वर्षे पूर्ण हवीत. मात्र, आपल्याकडे यासाठी कोणतेही नियम, अटी अथवा कायदे नाहीत. या वयोगटातील मुले अल्पवयीन, कमी समज असलेली आणि इंटरनेटबद्दल पुरेसे ज्ञान नसलेली असतात. अशा मुलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले जाते. त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपलेसे करून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. त्यातूनच चाइल्ड पोर्नोग्राफी, 'सेक्सटॉर्शन' यांसारखे गंभीर गुन्हे जन्माला आले आहेत. चाइल्ड पोर्नोग्राफी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक कायदे केल्यानंतर, त्याबाबत धडक कारवाया सुरू आहेत. चाइल्ड पॉर्न व्हिडिओ किंवा त्यासंबंधी कोणता व्हिडिओ, फोटो तुम्ही कुणाला पाठवला तर तुम्हाला जेलमध्ये जावे लागू शकते. हे रोखण्यासाठी अमेरिकेच्या 'नॅशनल सेंटर ऑफ मिसिंग अँड एक्स्प्लॉयटेड चिल्ड्रन'(एनमॅक) ही संस्था चाइल्ड पोर्नोग्राफीच्या विरोधात कार्यरत आहे. समाजमाध्यमे, संकेतस्थळांवरील चाइल्ड पोर्नोग्राफीबाबत ही संस्था अमेरिकेच्या 'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'(एफबीआय) या सर्वोच्च तपास यंत्रणेला माहिती पुरवते.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ...पण मी सांगितलं होतं मी पुन्हा येईन ; आम्ही करेक्ट कार्यक्रम केला!

## शुगर्स प्रथम गळीत हंगाम शुभारंभ व शेतकरी मेळाव्यात देवेंद्र फडणवीसांचं विधान!

। मुंबई । महाईन्यूज ।

सोलापुरमधील मंगळवेढा येथे आवताडे शुगर्स प्रथम गळीत हंगाम शुभारंभ व शेतकरी मेळाव्यास (शुक्रवार) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी त्यांनी भाषणादरम्यान त्यांच्या मी पुन्हा येईन, या गाजलेल्या वाक्याचा उल्लेख केला. शिवाय, आम्ही करेक्ट कार्यक्रम केला, असं म्हणत महाविकास आघाडीला टोलाही लगावला. उपमुख्यमंत्री फडणवीस या कार्यक्रमाती भाषणात



म्हणाले, "ज्यावेळी सुधाकर परिचारक हे निवडणुकीला उभे होते आणि त्यावेळी मी एक सभा घेण्यासाठी आलो होतो. आमच्या २४ गावांना पाणी देणारी मंगळवेढा उपसा सिंचन योजना ही मी करणार, असं त्या सभेत आश्वासन दिलं. ते आश्वासन दिल्यानंतर सरकारचं गेलं. पण मी सांगितलं होतं मी पुन्हा येईन आणि तुमची योजनाही मी पुन्हा येण्याची वाट पाहत बसली. मधल्या सरकारने फाईल सरकरवलीही नाही. पुन्हा तुमच्या आशीर्वादाने तुम्ही समाधान दादांना निवडून दिलं. पुन्हा समाधानदादांच्याही सभेत मी तेच आश्वासन दिलं की हे काम आपण करणार आणि मला अतिशय आनंद आहे. की तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने जे सांगितलं होतं की १०६ वा द्या करेक्ट कार्यक्रम आम्ही करतो. आम्ही करेक्ट कार्यक्रम केला आणि तुमच्या आशीर्वादाने, पांडुरंगाच्या आशीर्वादाने सरकार आलं. सरकार आल्याबरोबर आपण या योजनेला मोठ्याप्रमाणात गती दिली."

याशिवाय "येत्या काळात आपल्या राज्यातही नैसर्गिक शेतीचं मिशन आपल्याला राबवायचं आहे. शेतकरीच आपल्या शेतीसाठी आवश्यक सगळ्या गोष्टी आपल्या शेतातच तयार करेल. बाहेरून त्याला काही विकत आणावं लागणार नाही आणि याचा कुठेही त्याच्या उत्पादकतेवर परिणाम होणार नाही. उलट त्याची उत्पादकता वाढेल, अशाप्रकारचं नैसर्गिक शेतीचं एक काम आता आपण येत्या काळात सुरू करत आहोत. मला विश्वास आहे की त्यातून आमच्या शेतकऱ्याला सुजलाम, सुफलाम होण्यासाठी मोठ्याप्रमाणात मदत मिळेल." अशीही माहिती फडणवीसांनी यावेळी दिली.

## शॉर्ट न्यूज

### एकनाथ शिंदेंनी रुग्णालयात जाऊन शरद पवारांची घेतली भेट



। मुंबई । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मागील चार दिवसांपासून त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यात आज ( ४ नोव्हेंबर ) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शरद पवार यांची रुग्णालयात जात भेट घेतली. तसेच, प्रकृतीबाबत विचारपूस केली आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांनी संवाद साधला. "शरद पवार यांची प्रकृती चांगली आहे. शरद पवार यांनी माझ्याशी संवाद साधला. उद्या ते शिर्डीतील राष्ट्रवादीच्या शिबीराला जाणार आहेत. त्यानंतर पुन्हा रुग्णालयात येऊन त्यांच्या काही टेस्ट करतील. परत त्यांना डिस्चार्ज मिळेल, असं शरद पवार यांनी सांगितल्याचं," मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## साडेतीन कोटींचा मुद्देमाल जप्त

**मुंबई :** व्हेल माशाच्या उल्टीची (अंबरग्रीस) बेकायदा वाहतूक करणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखा आणि वन विभागाने संयुक्त कारवाई करून शुक्रवारी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सुमारे साडेतीन कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुणे-बंगळूरु महामार्गाजवळील सरनोबत वाडी येथे व्हेल माशाच्या उल्टीची (अंबरग्रीस) विक्री करण्यात येणार असल्याची माहिती मिळाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस आणि वन विभागाच्या पथकाने सापळा लावला.

## "शिवसेना फुटीला उद्धव ठाकरे आणि मी जबाबदार"

### आदित्य ठाकरेंचा मोठा गौप्यस्फोट

।मेढा (ता. जावली)।

। महाईन्यूज ।

एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे राज्यात सत्तानाट्य घडलं. एकनाथ शिंदेंसह ४० आमदारांनी भाजपाला साथ देत सरकार स्थापन केलं. त्यामुळे शिवसेनेत उभी फूट पडली. यानंतर शिवसेनेत फूट कोणामुळे पडली, अशा चर्चा रंगू लागल्या. काही जणांनी यासाठी भाजपाला, तर काहींनी राष्ट्रवादीला जबाबदार धरलं. यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आमदार आदित्य ठाकरेंनी यावर भाष्य केलं आहे.

एका कार्यक्रमात बोलताना आदित्य ठाकरेंनी शिवसेनेतील बंडखोरीवरून गौप्यस्फोट केला आहे. "शिवसेनेतील फुटीला उद्धव ठाकरे आणि मी जबाबदार आहे.



**"...नाहीतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले असते"**

**"भाजपा अडीच आणि शिवसेना अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाची बोलणी झाली होती. त्याच आधारावर युती करण्यावर सहमती झालेली. मात्र, भाजपाने ते आश्वासन पाळलं नाही. नाहीतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले असते. पण, आमचा तत्वांवर विश्वास आहे," असे आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे.**

उद्धव ठाकरेंनी आमदारांवर आंधळा विश्वास ठेवला. आम्ही त्यांना आमचे समजत होतो. गेल्या ४० ते ५० वर्षात मुख्यमंत्र्यांकडे राहिलेलं नगरविकास खातं, आम्ही त्यांना देऊ केलं होतं," असे सांगत आदित्य ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर हल्ला केला. "आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला. आम्हाला वाटलं नव्हतं ते पाठीमागून वार करतील.

सत्तेत असताना विरोधी पक्षातील नेत्यांना तडीपारीच्या नोटीसा दिल्या नाहीत. अथवा त्यांच्यावर पाळत ठेवली नाही. मात्र, आमच्या आमदारांवर पाळत ठेवली नाही, ही आमची चूक होती.

## ज्या घरात वाढलो तेच घर उद्ध्वस्त करणं ही बेईमानी – अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी "ज्या घरात वाढलो तेच घर उद्ध्वस्त करणे ही बेईमानी आहे आणि ती जनतेला पटलेली नाही," असं मत व्यक्त केलंय. तसेच सत्तेवर आल्यावर पक्षाच्या अनेक नेत्यांना आमिषे दाखविली जात आहेत, असा गंभीर आरोपही केला. ते शुक्रवारी (४ नोव्हेंबर) अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे राष्ट्रवादीच्या मंथन शिबिरात बोलत होते. यावेळी त्यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबतही मार्गदर्शन केलं. अजित पवार म्हणाले, "सत्तेवर आल्यावर पक्षाच्या अनेक नेत्यांना आमिषे दाखविली जात आहेत. त्यांच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका. जे पक्ष सोडून गेले ते आज अस्वस्थ आहेत. ते नेते तसे बोलून दाखवत आहेत. ज्या घरात वाढलो तेच घर उद्ध्वस्त करणे ही बेईमानी जनतेला पटलेली नाही. शिवसेना नाव आणि त्यांचे चिन्ह गोठवले तेही जनतेला रुचले नाही."

"जनतेचा एकनाथ शिंदे यांच्यावर प्रचंड राग""जनतेचा एकनाथ शिंदे यांच्यावर प्रचंड राग आहे. बच्चू कडू यांनी एका वाहिनीवर मुलाखतीत मुख्यमंत्री म्हणून पद मिळवले ते ठीक आहे, परंतु पक्षावर दावा करणे योग्य नाही असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. राक्षसी महत्त्वकांक्षा योग्य नाही," अशी टीका अजित पवारांनी केली.



**"शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाली आहे"**

अजित पवार पुढे म्हणाले, "यंदा राज्यात अतिवृष्टीमुळे शेतजमिनीचे आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाली आहे. विम्याची भरपाई द्या अशी मागणी केली आहे. ओला दुष्काळ जाहीर करा सांगून तो जाहीर केला नाही. हे १३ कोटी जनतेचे दुर्दैव आहे."

'राष्ट्रवादी मंथन वेध भविष्याचा' हे ब्रीद वाक्य घेऊन आपण हे शिबीर करत आहोत.

येणाऱ्या भविष्यात पक्षाने काय केले पाहिजे, कसे वागले पाहिजे, कोणत्या पध्दतीने काम केले पाहिजे आणि पक्षाची पुढची वाटचाल ठरवण्यासाठी हे शिबीर असल्याची माहिती अजित पवारांनी दिली.

### "पाचही जागा आघाडीच्या येण्यासाठी जीवाचे रान करा"

अजित पवारांनी आगामी निवडणुकांबाबत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना आवाहन केलं. ते म्हणाले, "सत्तेच्या माध्यमातून लोकांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. फेब्रुवारी २०२३ मध्ये पाच निवडणूका होत आहेत. याबाबत सर्व पक्षाच्या लोकांना घेऊन चर्चा करण्यात आली आहे. या निवडणूका आघाडी म्हणून लढवल्या जाणार आहेत. या पाचही जागा आघाडीच्या कशा येतील त्यासाठी जीवाचे रान केले पाहिजे."

### स्वतंत्र लढायचं त्यादृष्टीने कामाला लागा"

"स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेले कार्यकर्तेच पक्षाला ताकद देतात. त्यातून आमदार, खासदार तयार होतात. हेच लोक लोकसभा, विधानसभा निवडणुकीची वाट सोपी करणारे आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या विचारांची माणसे निवडून आणावीत. पक्षाकडून निर्णय येईल याची वाट बघत बसू नका. निर्णय येईल तेव्हा येईल, तोपर्यंत स्वतंत्र लढायचं आहे त्यादृष्टीने कामाला लागा," असे आवाहन अजित पवार यांनी केले.

### स्वतंत्र लढायचं त्यादृष्टीने कामाला लागा"

"लोकशाही व्यवस्थेला नख लावण्याचे काम होतेय, मात्र, ते कधीही यशस्वी होणार नाही. सर्व निवडणुका वेळेत होणे आवश्यक आहे, परंतु निवडणुकांना विलंब लावला जात आहे. हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. निवडणूका वेळेत होणे याकडे राज्य निवडणूक आयोगाने लक्ष दिले पाहिजे. त्यांची ती जबाबदारी आहे,"

# पंजाबमध्ये शिवसेना नेते सुधीर सुरी यांची गोळ्या घालून हत्या, आरोपीला अटक

## सुधीर सुरी मंदिराबाहेर आंदोलन करत होते, तेव्हा हा हल्ला झाला

। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंजाबमधील अमृतसरमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील शिवसेना नेते सुधीर सुरी यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. या घटनेत सुधीर सुरी गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर सुरी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असता मृत घोषित केलं.



अमृतसर येथील गोपाळ मंदिराच्या बाहेर कचऱ्यात देवांच्या मुर्ती सापडल्या होत्या. यावरून मंदिराच्या बाहेर सुधीर सुरी आंदोलनाला बसले होते. तेव्हाच गर्दीतून आलेल्या एकाने त्यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत सुधीर सुरी गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर आनन-फानन रुग्णालयात सुधीर सुरी यांना दाखल करण्यात आलं होतं. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. घटनेनंतर पोलिसांनी आरोपीला अटक केल्याची माहिती दिली आहे. सुधीर सुरी यांना तीन ते चार गोळ्या लागल्याची शक्यता वर्तवली जात होती. मागील काही दिवसांपासून सुधीर सुरी यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचला जात होता. त्याची कुणकूण लागताच पोलिसांनी काही लोकांना अटक सुद्धा केली होती.

पंजाब एसटीएफ आणि अमृतसर पोलिसांनी २३ ऑक्टोबरला ४ जणांना अटक केली होती. अटक करण्यात आलेले आरोपी रिंडा आणि लिंडा टोळीसाठी काम करत होते. पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी सुधीर सुरी यांच्या हल्ल्याचा कट रचल्याचा खळबळजनक खुलासा केला होता. यासाठी सुधीर सुरी यांची रेकीही केले होती. दिवाळीपूर्वीच सुरी यांच्यावर हल्ला करायचा होता, असेही आरोपींनी पोलीस चौकशीत सांगितलं होतं.

# 'आप'कडून माजी पत्रकाराला मुख्यमंत्रीपदाची उमेदवारी

। जयपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मागील काही दिवसांपासून आम आदमी पार्टीचे अनेक नेते गुजरातमध्ये तळ ठोकून बसले आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'आप'कडून जोरदार प्रचार केला जात आहे. आज अखेर आम आदमी पार्टीने गुजरामधील मुख्यमंत्री पदाचा उमेदवार घोषित केला आहे. माजी पत्रकार इसुदान गढवी हे आम आदमी पार्टीचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार असणार आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा केली.


गुजरातचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठी आम आदमी पार्टीने एक सर्वेक्षण घेतलं होतं. यामध्ये जवळपास १६ लाख ४८ हजार ५०० लोकांनी सहभाग घेतला. यातील ७३ टक्के लोकांनी इसुदान गढवी हे मुख्यमंत्री असावेत, अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. याआधी पंजाबचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठीही 'आप'ने अशाच प्रकारचं सर्वेक्षण केलं होतं. इसुदान गढवी यांनी गेल्यावर्षी जूनमध्ये पत्रकारिकतेला रामराम ठोकला होता. त्यानंतर त्यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश केला. गुजरात 'आप'चे प्रमुख गोपाल इटालिया हेही मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी शर्यतीत होते. मात्र, ७३ टक्के मतं इसुदान गढवी यांनी मिळाली आहेत. त्यानुसार जनतेचा कौल विचारात घेऊन गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी घोषणा झाल्यानंतर गढवी यांनी ट्विटरवर प्रतिक्रिया दिली.



# मध्य प्रदेशात भीषण अपघात! बसने दिलेल्या धडकेत महाराष्ट्रातील ११ कामगार ठार

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मध्य प्रदेशात बसने वाहनाला दिलेल्या धडकेत ११ कामगारांचा मृत्यू झाला आहे. बेतूल येथे गुरुवारी रात्री हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हे सर्व ११ कामगार महाराष्ट्रातील होते. बसने दिलेल्या धडकेनंतर कारचा अक्षरश: चेंदामेंदा झाला होता. पोलिसांना पत्रा कापून काही मृतदेह बाहेर काढावे लागले. एका जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे कामगार महाराष्ट्रातील अमरावती येथे निघाले होते. रात्री २ वाजता बसने त्यांच्या एसयुव्हीला धडक दिली. अपघातानंतर सात मृतदेह तात्काळ बाहेर काढण्यात आले.

# एलॉन मस्क यांचा कर्मचारी कपातीचा इशारा

## सुरक्षा उपकरणांबाबत चिंता

। बर्लिन । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या एलॉन मस्क हे ट्वीटर कंपनीचे मालक झाल्यापासून घडामोडींना वेग आला आहे. मस्क यांनी कंपनीमधून ५० टक्के कर्मचारी कपात करणार असल्याचं म्हटलं आहे. मात्र मस्क यांनी यासंदर्भातील घोषणा केल्यानंतर काही वेळातच जगभरातील अनेक भागांमध्ये ट्वीटरची सेवा विस्कळीत झाल्याचं दिसून येत आहे. ट्वीटर मोबाईलवर व्यवस्थित काम करत असलं तरी ट्वीटर वेबवर बऱ्याच तांत्रिक अडचणी येत आहेत. अनेकांना ट्वीटरवर पोस्ट करण्यात, रिफ्रेशन करण्यात अडचणी येत आहे. "Something went wrong, but don't fret — let's give it another shot," असा मेसेज अनेकांनी दिसत आहे. एका तासाहून अधिक काळ अनेकांना या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र अनेकांनी या तांत्रिक अडचणींचा संदर्भ आता कर्मचारी कपातीच्या इशाऱ्याशी जोडण्यास सुरुवात केली आहे. जगभरातील वेगवेगळ्या वेबसाइट्सवरील तांत्रिक अडचणींवर लक्ष ठेऊन असलेल्या 'डाऊन डिडेक्टर'वर अनेकांनी ट्वीटर रिफ्रेश होत नसल्याचं म्हटलं आहे. अनेकांनी ट्वीटर वेबवरुन लॉगइन करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. वेबसाईटवर अनेकांना लॉगइन एरर दाखवत आहेत. 'डाऊन डिडेक्टर'च्या आकडेवारीनुसार ९४ टक्के लोकांनी ट्वीटर वेबवर लॉगइनला अडचणी येत असल्याचं म्हटलं आहे. तर सहा टक्के लोकांना मोबाईलवरुन ट्वीटर पाहण्यात अडचणी येत आहेत. मात्र भारतामध्ये अनेक ठिकाणी आयओएस आणि अँण्ड्रॉइडवर ट्वीटर व्यवस्थित काम करत असलं तरी ट्वीटर वेबवर अनेकांना अडचणींचा सामना करावा लागतोय.

# दिल्ली-एनसीआरमध्ये वायू प्रदुषणाने गाठली गंभीर पातळी

## नोएडामध्ये पहिली ते आठवीपर्यंत शाळा ऑनलाईन!

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दिल्ली-एनसीआर मध्ये प्रदुषणाने गंभीर पातळी गाठली असून हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत आहे. हे सर्वांसाठीच अत्यंत धोकादायक बनत आहे. मोठ्यांच्या तुलनेत लहान मुलांना याचा अधिक धोका जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर आता स्थानिक प्रशासनाकडून काही तातडीची पावलं उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून आता गौतमबुद्ध नगरमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




८ नोव्हेंबरपर्यंत ही व्यवस्था अनिवार्य स्वरूपात लागू असणार आहे. यासंबधीचा शासकीय आदेश जारी करण्यात आला आहे. तर या आदेशात असेही म्हटले आहे की, इयत्ता नववी ते बारावीच्या वर्गांचेही ऑनलाईन वर्ग सुरू केले जाऊ शकतात.

दिल्ली-एनसीआरमध्ये हवेची गुणवत्ता सातत्याने घसरत आहे. एअर क्वालिटी इंडेक्स(AQI) सद्यस्थितीस नोएडा(यूपी) मध्ये ५६२ गंभीर श्रेणी, गुरुग्राम(हरियाणा) – ५३९ गंभीर श्रेणी आणि दिल्ली विद्यापीठ परिसर ५६३- गंभीर श्रेणीत आहे. दिल्लीचा एकूण एअर क्वालिटी इंडेक्स सध्या ४७२ वर गंभीर श्रेणीत आहे.

गौतमबुद्ध नगर जिल्हा शाळा निरीक्षक(डीआयओएस) धर्मवीर सिंह यांच्याद्वारे जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, शाळांना सूचित करण्यात आले आहे की, जर शक्य असेल तर इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्गही ऑनलाईन केले जावेत. याशिवाय वर्गाबाहेर कार्यक्रम जसे की प्रार्थना, मैदानी खेळ आदींवर पूर्णपणे निर्बंध आणण्यात आले आहेत. धर्मवीर सिंह यांनी म्हटले की, सर्व शाळांना इयत्ता आठवीपर्यंतचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निर्देश दिले जात आहेत. याशिवाय त्यांना शक्य झाल्यास इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्गही ऑनलाइन स्वरूपात घेण्यास सांगितले आहे. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरामध्ये (एनसीआर) हवेची पातळी आणखी खालावल्यानंतर तातडीचे उपाय योजण्यात आले आहेत. 'श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती आराखडा' (जीआरएपी) अंतर्गत डिझेलवर चालणाऱ्या वाहनांना बंदी घालण्यात आली असून ट्रकना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. दुसरीकडे खराब हवेमुळे दवाखान्यांमध्ये श्वसनाच्या विकारांवरील रुग्णांची गर्दी वाढताना दिसत आहे.

# “कशाला पाहिजे टिकली फिकली...”





“आपले नवरे कुठे लावतात आपल्या नावाचं काही मग आपणच का लावायची? शिवप्रतिष्ठान संघटनेचे अध्यक्ष संभाजी भिडे वादग्रस्त वक्तव्यामुळे सध्या चर्चेत आहेत. महिला पत्रकाराशी बोलताना केलेल्या एका विधानामुळे संभाजी भिडे हे चर्चेत आले आहेत. त्यांच्या या विधानावर सर्व स्तरावरुन प्रतिक्रिया उमटत असल्याचे दिसत आहे. नुकतंच मराठीतील एका प्रसिद्ध अभिनेत्रीने प्रकरणावर उघडपणे भाष्य केले आहे. तिने याबद्दल जाहीरपणे तिचे मत मांडले आहे.

मराठी अभिनेत्री राधिका देशपांडे ही कायमच सोशल मीडियावर सक्रीय असते. स्टार प्रवाहवरील आई कुठे काय करते या मालिकेत तिने देविका हे पात्र साकारलं होतं. या मालिकेत अरुंधतीची सर्वात जवळच्या आणि लाडक्या मैत्रिणीचे हे पात्र होते. नुकतंच तिने तिचे टिकली याबद्दलचे भाष्य केले आहे.

## बॉलिवूडमधील टॉपच्या अभिनेत्रींमध्ये हुमा कुरेशीच्या नावाचाही समावेश

बॉलिवूडमधील टॉपच्या अभिनेत्रींमध्ये हुमा कुरेशीच्या नावाचाही समावेश आहे. सध्या हुमा तिच्या आगामी ‘डबल एक्सएल’ चित्रपटामुळे चर्चेत आहे. लवकरच सोनाही सिन्हाबरोबरचा तिचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दाखल होईल. या चित्रपटासाठी दोघींनीही आपल्या लूकमध्ये बदल केला होता. चित्रपटामधील भूमिकेसाठी वजन वाढवलं. पण प्रत्यक्षातही हुमाला शरीरयष्टीवरून तसेच वाढत्या वजनावरून बरंच ट्रोल करण्यात आलं. याबाबतच तिने आता खुलासा केला आहे. हुमा सध्या ‘डबल एक्सएल’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान हुमाला अनेक प्रश्न विचारण्यात आले. यावेळी सोनाक्षीही उपस्थित होती. प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान ‘एबीपी न्यूज’शी संवाद साधत असताना हुमाने आपल्याला आधी शरीरयष्टीवरून बरेच प्रश्न विचारण्यात आले असल्याचं ती म्हणाली.



“ही खूप आधीची गोष्ट आहे. एका पत्रकार परिषदेदरम्यान मला विचारण्यात आलं होतं की तू बिकिनी कधी परिधान करणार? तुझं वजन कधी कमी होणार? पण त्यावेळी मला कोणत्या गोष्टीचं अधिक ज्ञान नव्हतं. पण तरीही भर कार्यक्रमामध्ये सेलिब्रिटींना असे प्रश्न कोण विचारतं हा विचार माझ्या मनात आला.” असं हुमा यावेळी म्हणाली.

वाढत्या वजनामुळे ट्रोल करण्यात आलं. इतकंच नव्हे तर चित्रपटांमध्येही काम मिळत नसल्याचं हुमाने यावेळी सांगितलं. हुमाने आधीही आपल्याला बॉडी शेमिंगचा सामाना करावा लागला असल्याचं काही मुलाखतींमध्ये म्हटलं आहे.

## “कोण म्हणतं बॉलिवूडमध्ये मैत्री...”



बॉलिवूड अभिनेत्री तब्बू आज तिचा ५२ वा वाढदिवस साजरा करत आहे. केवळ आणि केवळ अभिनयाच्या जोरावर चित्रपटसृष्टीत इतकी वर्ष टिकून राहिलेली आणि सतत कार्यरत असणाऱ्या तब्बूचा चाहतावर्ग चांगलाच मोठा आहे. अगदी ज्येष्ठ मंडळींपासून सध्याच्या तरुणाईतसुद्धा तिची क्रेझ बघायला मिळते, अशा या सदाबहार अभिनेत्रीला सोशल मीडियावर सगळेच शुभेच्छा देत आहेत.

# अतिउत्साहीपणा नडला; तोल गेला अन् नदीत पडली कंगना



अतिउत्साही असलं की नेमकं काय घडतं? हे कंगना रणौतने फोटो शेअर करत सांगितलं आहे.

अभिनेत्री कंगना रणौत सध्या तिच्या आगामी ‘इमरजंसी’ चित्रपटाच्या कामामध्ये व्यग्र आहे. ती या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी सध्या आसाममध्ये रेकी करत आहे. यादरम्यानचेच काही फोटो कंगनाने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे शेअर केले. या फोटोंमध्ये ती आपल्या टीमबरोबर काम करण्यात व्यग्र असल्याचं दिसून येत आहे. पण घनदाट जंगल आणि जंगलामधील नदी पार करणं कंगनासाठी कठिण होतं. तिने या संबंधितच शेअर केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरत आहे.ध्ये आहेत. कंगनाने शेअर केलेल्या फोटोमध्ये अतिउत्साह असला की नेमकं काय घडतं हे सांगितलं आहे. नदीमधून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असताना नदीच्या वाहत्या पाण्यामध्ये कंगना पडते. आणि याच पाण्यामधून वाट काढून ती चालत असल्याचं फोटोमध्ये पाहायला मिळत आहे.

## गोवन गाण्यावर माधुरी दीक्षितचा भन्नाट डान्स

बॉलिवूडच्या धक धोका गर्ल माधुरी दीक्षितने आजवर चित्रपटातून नृत्यातून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. गेली अनेकवर्ष ती या क्षेत्रात कार्यरत आहे. सध्या ती कलर्स वाहिनीवरील ‘झलक दिखला जा’ या लोकप्रिय कार्यक्रमात दिसत आहे. या कार्यक्रमात प्रत्येक भागात नवे पाहुणे येत असतात. माधुरी त्यांच्याबरोबर ठेका धरताना दिसते. नुकताच तिचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यात ती एका गोवन गाण्यावर नाचताना दिसली आहे. मराठमोळा संगीतकार अवधूत गुप्ते याने गायलेले गाणे ‘माझा वांगडा चाल ना गो’ हे गोवन हिंदी भाषेतील गाणे लोकप्रिय ठरले आहे. माधुरीने या गाण्याचा व्हिडीओ आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आहे. ‘आयुष्य हे आठवणी तयार करत असतं’. असा कॅप्शनदेखील तिने दिला आहे. तिच्या या पोस्टवर अवधूतने कॉमेंट केली आहे वाव, ‘इतका मोठा सन्मान’ या शब्दात त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. माधुरी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर कायमच रील्स शेअर करत असते. तिचे चाहतेदेखील याचे कौतुक करत असतात. नुकतेच तिने दिल तो पागल हैं चित्रपटाला २५ वर्ष झाली म्हणून रील शेअर केले होते. तिच्या या रीलला नेटकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला होता. माधुरीने दिवाळी पार्टीतला एक व्हिडीओ शेअर केला होता ज्यात ती काजोलबरोबर ठेका धरताना दिसली होती.



## शॉर्ट न्यूज »

### शाहिद आफ्रिदीचा आयसीसीवर गंभीर आरोप

**।नवी दिल्ली। महाईन्यूज**

पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने आयसीसीवर भारताला अवाजवी पाठिंबा दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. समा टीव्ही शोमध्ये बोलताना शाहिद आफ्रिदीने हा आरोप केला आहे. शाहिद आफ्रिदी भारत-बांगलादेश सामन्याबद्धल बोलताना म्हणाला, 'तुम्ही पाहिले असेल की मैदान किती ओले होते. पण आयसीसीचा कल भारताकडे आहे. त्यांना कोणत्याही किंमतीत भारताला उपांत्य फेरी पोहोचवायचे आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यादरम्यान अंपायर देखील तेच होते, ज्यांना सर्वोत्कृष्ट पंचाचा पुरस्कार मिळेल असे दिसते.' शाहिद आफ्रिदी पुढे म्हणाला, 'पाऊस खूप झाला होता. मात्र, विश्रांतीनंतर खेळ पुन्हा सुरू झाला. हे अगदी स्पष्ट आहे की आयसीसीमध्ये अनेक गोष्टींचा समावेश होता, भारत जो सामना खेळत होता, त्यात येणारा दबाव, अनेक घटक गुंतलेले आहेत. पण, लिटन दासची फलंदाजी अप्रतिम होती. तो सकारात्मक क्रिकेट खेळला. सहा षटकांनंतर आम्हाला वाटले की बांगलादेशने आणखी २-३ षटकात विकेट गमावल्या नसत्या तर सामना जिंकला असता.

# विजयानंतरही ऑस्ट्रेलियावर विश्वचषकातून बाहेर होण्याची टांगती तलवार कायम

## ऑस्ट्रेलियाचा अफगाणिस्तानवर 4 धावांनी निसटता विजय

**ऑस्ट्रेलिया। महाईन्यूज । वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाने शुक्रवारी टी-२० विश्वचषक २०२२च्या ३८ व्या सामन्यात अफगाणिस्तानवर ४ धावांनी विजय मिळवला. या विजयानंतर संघाने गुणतालिकेत पहिल्या २ मध्ये स्थान पटकावले. मात्र, अजूनही गतविजेत्या संघाच्या नावासमोर क्वालिफिकेशनचे चिन्ह नाही. ऑस्ट्रेलियाला अजूनही वर्ल्डकपमधून बाहेर पडण्याचा धोका कायम आहे.

वास्तविक, अफगाणिस्तानविरुद्धच्या विजयानंतर ऑस्ट्रेलियाचा नेट रनरेट -०.१७ आहे, तर इंग्लंड +०.५४७ च्या नेट रनरेटसह तिसऱ्या स्थानावर आहे. शनिवारी इंग्लंड श्रीलंकेविरुद्ध शेवटचा सामना खेळणार आहे, या सामन्यातील विजयासह इंग्लंड उपांत्य फेरीत पोहोचणारा दुसरा संघ ठरणार आहे. खराब नेट रनरेटमुळे ७ गुण असूनही ऑस्ट्रेलियाला विश्वचषकातून बाहेर पडावे लागू शकते. . दुसरीकडे, इंग्लंडवर श्रीलंकेने मात केल्यास ऑस्ट्रेलिया हा उपांत्य फेरी गाठणारा ग्रुप-१ मधून दुसरा संघ बनेल. ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान सामन्याबद्धल बोलायचे झाले तर, प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १६८ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने सर्वाधिक नाबाद ५४ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर मिचेल मार्शने ४५, वॉर्नर आणि स्टॉइनिसने प्रत्येकी २५ धावा केल्या. दुसरीकडे अफगाणिस्तानकडून नवीन-उल-हकने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या.

नेट रनरेटच्या बाबतीत इंग्लंडला मागे टाकण्यासाठी ऑस्ट्रेलियाला अफगाणिस्तानला १०६ धावांच्या आधीच रोखायचे होते, पण कांगारू संघाला त्यात अपयश आले. १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानला २० षटकांत ७ गडी गमावून १६४ धावांपर्यंतच मजल मारता आली. शेवटी राशीद खानने २३ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ४८ धावांची तुफानी खेळी केली, मात्र तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. अफगाणिस्तान १३व्या षटकापर्यंत सामन्यात टिकून होता, परंतु झंपाच्या १४व्या षटकात १ धावबादसह एकूण तीन विकेट्स पडल्या, ज्यामुळे सामना ऑस्ट्रेलियाच्या दिशेने वळला.

# टीम इंडियासाठी वेकअप कॉल!

## सुरेश रैनाने भारतीय संघाला सुनावले खडेबोल

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी२० विश्वचषकात ग्रुप बी मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात ॲडलेडमध्ये सामना खेळला गेला. अटीतटीच्या सामन्यात टीम इंडियाचा बांगलादेशवर पाच धावांनी निसटता विजय झाला असून उपांत्य फेरीतील स्थान जवळपास निश्चित केले आहे. डकवर्थ लुईसच्या नियमानुसार धावांचे लक्ष हे १६ षटकात १५१ करण्यात आले होते. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. या विजयावर सुरेश रैनाने नाराजी व्यक्त करत संघाला खडेबोल सुनावले आहे.

सुरेश रैना भारतीय संघाच्या खराब कामगिरीवर म्हणाला की, " या सामन्यात बांगलादेशने ज्या प्रकारे झुंज दिली, जर पावसाने खेळात व्यत्यय आणला नसता तर सामना त्यांच्या बाजूने झुकला होता. पहिल्या सात षटकांमध्ये लिटन दासने भारतीय गोलंदाजांची धुलाई केली. यातून टीम इंडियाच्या गोलंदाजांनी बोध घ्यायला हवा. रोहित शर्मानेही सामन्यानंतर बांगलादेश भारतापेक्षा सरस असल्याचे मान्य केले. टीम इंडियासाठी हा वेक अप कॉल होता आणि याकडे रोहित ब्रिगेडला गांभीर्याने घ्यावे लागेल. त्यांना उपांत्य आणि अंतिम फेरीत सर्वोत्तम कामगिरीचे प्रदर्शन करणे आवश्यक आहे. कारण त्यांच्यासमोर अधिक कडवे आव्हान आहे,"असे रैनाने आज तकशी सवांद साधताना विधान केले. आहे. टीम इंडियाच्या फलंदाजीवर बोलताना रैना म्हणाला की,"भारताचे आघाडीचे ५ फलंदाज चांगली कामगिरी करत आहेत.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही